

आंतरराष्ट्रीय
आंतरविद्याशाखीय परिषद

International Interdisciplinary Conference

# Aspects of Folk-Culture in Literature at National and International Level

# देशविदेशातील लोकसंस्कृतीचे साहित्यातील दर्शन

संपादक
डॉ. स्नेहल तावरे

(या ग्रंथातील लेख पूर्णत: त्या त्या लेखकांचे आहेत. कोणत्याही प्रकारचा पुनर्वापर करताना लेखी परवानगी आवश्यक आहे.)


- स्नेहवर्धन प्रकाशन : क्र. १०९०
- देशविदेशातील लोकसंस्कृतीचे साहित्यातील दर्शन (समीक्षा – संदर्भ)
- प्रकाशक आणि मुद्रक :
  डॉ. एल. व्ही. तावरे
  स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे,
  पुणे – ४११ ०३०.
  स्थिरभाष : (०२०) २४४७ २५ ४९ / २४४३६९६१
  ई-मेल : snehaltawre@gmail.com


- © सर्व हक्क सुरक्षित


- प्रथमावृत्ती : २६ नोव्हेंबर २०१७,
  पाचवी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, थायलंड
- मुखपृष्ठ : राजेंद्र गिरधारी
- अक्षरजुळणी : एस.एस. ग्राफिक्स
- मुद्रणस्थळ : स्मिता प्रिंटर्स, पुणे
- पृष्ठसंख्या : ३२८
- ISBN 978-93-85709-08-1
- मूल्य : ₹ ३५०/–
  $ 6

१४. लोककलेतील लोकसंस्कृतीचे विविध कलाविष्कार
– डॉ. शीला गाढे /९९
१५. 'स्त्री'गीतात निसर्गदर्शन – डॉ. लता महाजन /१०६
१६. एकविसाव्या शतकातील आदिवासी संस्कृती
– डॉ. पुष्पा गावीत /११२
१७. लोकसहित्यातील एक देखणं लेणं –
उखाणा : परंपरा आणि स्वरूप – प्रा. वंदना जोशी /११७
१८. लोकगीतांचा आध्यात्मिक दृष्टिकोण
– डॉ. संतोषराव ठाकरे /१२४
१९. बहुभाषिक जैन साहित्याचे पैलू – डॉ. जगदीश आवटे /१२९
(मध्ययुगीन कालखंडासंदर्भात)
२०. मराठी लोकसंस्कृतीतील स्त्रीप्रधान लोकाविष्काराची रूपे
– डॉ. उज्ज्वला भोर /१३६
२१. लोकसंकृतीचे उपासक संत गाडगेबाबा
– डॉ. राजाराम गावडे /१४४
२२. लोकसंस्कृती व स्त्रीवादी साहित्य यांचा बदलता अनुबंध
– डॉ. द. के. गंधारे /१५०
२३. जन्म ते मृत्यू आणि महाराष्ट्रातील लोकसंस्कृती : एक अन्वय
– डॉ. संजय नगरकर /१५७
२४. संगीतामध्ये लोकसंस्कृतीचे पैलू – डॉ. संगीता बापट /१६४
२५. लोकसंस्कृतीचा अविभाज्य घटक – दैवते
– डॉ. संजय घोडेकर /१७०
२६. पुणे येथील पर्वती परिसरातील लोकसंस्कृती
– डॉ. महालक्ष्मी मोराळे /१७६
२७. महाराष्ट्र संस्कृती व (लोक) साहित्याविष्कार
– डॉ. पौर्णिमा बोडके /१८३
२८. लोकसंस्कृती आणि वारकरी चळवळ
– डॉ. गजानन जाधव /१८९
२९. लोकसंस्कृतीचे स्वरूप – प्रा. जयश्री थोरवे /१९७
३०. लोकसंस्कृतीचा उपासक : वासुदेव
– डॉ. दादासाहेब कोळी /२०४

३१. संत तुकारामांच्या साहित्यातील लोकसंस्कृतीचे विविध पैलू
– डॉ. महादेव वाळुंज /२११
३२. मराठी साहित्यातील जैन लोकगीतांचे पैलू – श्रीमती सुनीता आवटे
– डॉ. जगदीश आवटे /२१८
३३. लोकनायक तुलसी – डॉ. वीणा मनचंदा /२२५
३४. हिंदी साहित्य में लोक–नृत्य – श्री. अजित रेखी /२३१
– डॉ. अमरजा रेखी
३५. हिंदी उपन्यासों में लोक संस्कृति : – डॉ. अमरजा रेखी /२३५
(आँचलिक उपन्यास 'मैला आँचल' के सन्दर्भ में)
३६. 'सूरसागर' में लोक–संस्कृति के दर्शन
– प्रा. मंगला भवर /२४०

37. Folk Music
- **Dr. Shubhangi Bahulikar /247**
38. Visual Folk Art Inspired Brand Design
- **Prof. Ranjana Dani /254**
39. Simhasth Kumbhamela – 2015, Nashik (Maharashtra)
- **Dr. Dattatraya Gadhe /262**
40. Globalization and It`s Impact on Indian Culture
- **Dr. B.Y. Deshmukh /269**
41. Aspects of Folk Culture in Design at National and International Level -
**Prof. Sumedha Sahasrabuddhe /274**
42. Chinua Achebe's Things Fall Apart: Exploring the Ibo Culture and Folk Aspect in it
**Dr. Swati Braham Singh / 281**
43. Marketing of Library Services : A Publicity Tool
- **Dr. Nilesh Gawande /289**
44. Folk Culture in Typography Reviving Modi-Script
- **Dr. Rajendra Thakre /295**
45. Significance of Prasad in Indian Folk Culture...' An offering to the Indian Gods'
- **Prof. Ranjana Dani**
**Nupur Joshi /301**

# लोकसंस्कृतीचा अविभाज्य घटक– दैवते

डॉ. संजय घोडेकर

लोकसंस्कृती हा लोकसाहित्याच्या अभ्यासाचा महत्त्वाचा घटक आहे. किंबहुना मूळ पाया आहे. तसेच या लोकसंस्कृतीचा गाभा असलेली ग्रामदैवते आणि त्यांचे विधी महत्वाचे असतात. एखाद्या गीतात किंवा लोककथेत एखादा विधी विशिष्ट पद्धतीने का केला जातो, याचे जे वर्णन आलेले असते. त्याचा उलगडा करून घेण्यासाठी शेवटी लोकसंस्कृतीकडे व ग्रामदैवतांकडे जावे लागते. उदा. खंडोबाचा वाघ्या, जागरण–गोंधळावेळी ताटात किंवा पातेल्यात तोंड घालून पाणी पितो, याचे उत्तर लोकसंस्कृती देते. भैरवनाथाच्या मंदिरात त्रिशूळ का असतो. पोतराज वेगवेगळ्या रंगांच्या चिंध्या कमरेला बांधून स्त्रीवेष धारण करून मरिआईचा गाडा घेऊन गावात का जातो, या प्रश्नांची उत्तरे लोकसंस्कृती मध्येच सापडतात. खंडोबाला कुत्रा हा अतिशय प्रिय आहे. त्याला 'वाघ्या' असे नाव साहित्यात आढळते. खंडोबाचा वाघ्या कुत्र्याचा प्रतिनिधी म्हणजे जागरण गोंधळातला हा वाघ्या मानला जातो. म्हणून हा वाघ्याही देवाच्या त्या कुत्र्याप्रमाणे पाणी पिण्याची कृती करताना आढळतो. हेच पोतराज व त्रिशुळाबाबतही आहे. तो लोकसंस्कृतीचाच भाग आहे. त्यामुळे लोकसाहित्याच्या अभ्यासाला लोकसंस्कृती व ग्रामदैवते यांचा अभ्यास अत्यंत आवश्यक आणि उपयुक्त ठरतो.

संस्कृती ही बाब इतकी बहुआयामी व गुंतागुंतीची आहे की, तिची काटेकोर व्याख्या करणे अवघड आहे. संस्कृतीच्या व्याख्यांत विविधता आढळते ती यामुळेच. माणूस हा भोवतालच्या निसर्गामध्ये जीवनाच्या प्रगतीला अनुकूल असे बदल करून म्हणजे त्यावर संस्कार करून आपले जीवन अधिक सुरक्षित, अधिक सुखमय आणि अधिक समृद्ध बनवितो. त्याबरोबरच तो स्वतःचे मन, बुद्धी, कल्पकता यांचा अधिक चांगला वापर करतो. त्यांच्यावरही संस्कार करतो. यांना संस्कृती म्हणता येईल. म्हणजे धर्मासह समग्र अंतर्बाह्य जीवनाच्या उन्नत अवस्थेचे परंपरेने वाढत जाणारे प्रतीक म्हणजे संस्कृती होय. संस्कृतीत भौतिक सृष्टीतील परिवर्तन व त्याचबरोबर मानसिक परिवर्तन हातात हात घालून येत असते. एखाद्या पाषाणाची मूर्ती तयार करणे हे झाले भौतिक परिवर्तन, तर त्या मूर्तीला पाहून आपल्या मनात देवाची कल्पना निर्माण होणे अन् त्यातून त्याला भक्तिभावाने हात जोडणे हे झाले मानसिक परिवर्तन. धर्म, नीती, कला, विद्या, कायदा, सभ्यता, शिष्टाचार या गोष्टी मानसिक गरज आणि मानसिक परिवर्तन यांच्याच निदर्शक



म्हणता येतील. माणसाला स्त्रीची आणि धनाची अभिलाषा उत्पन्न होणे ही नैसर्गिक प्रवृत्ती झाली. अशा नानाविध नैसर्गिक प्रवृत्ती अनिर्बंधपणे वाढू लागल्यावर त्यातून स्वार्थ, स्वैराचार, फसवणूक, खून–मारामारी अशा अनेक गोष्टी समाजात घडू लागतील आणि मानवी जीवन अस्थिर बनू लागेल. म्हणून विचारवंतांनी समाजाला 'समाजपणय प्राप्त होण्यासाठी व त्यातून संस्कृती साकार होण्यासाठी काही नियम तयार केले. भोगलालसेवर नियंत्रण घातले. निसर्गाच्या गूढतेचा त्याला शोध घेता येत नसल्याने त्याने आपल्या जीवनाला संरक्षण देणाऱ्या देवदेवता निर्माण केल्या. त्या आपणावर प्रसन्न व्हाव्यात म्हणून काही धार्मिक विधी निर्माण केले. कला निर्माण केल्या. या साऱ्यांची परंपरा तयार होत गेली. त्यात प्रत्येक पिढीने नवीन भर घातली. ती पुढच्या पिढीच्या हवाली केली. भाषेमुळे त्यात अधिक सुंदरता निर्माण झाली आणि त्या साऱ्या गोष्टींना मिळून संस्कृती हे नाव प्राप्त झाले. आपले जीवन अधिक सुखी, आकर्षक, समृद्ध, निरामय, निकोप, मूल्याधिष्ठित होण्यासाठी व त्यातही पुन्हा श्रमांची बचत होण्यासाठी केलेली धडपड, केलेली नवनिर्मिती म्हणजे संस्कृती होय. इमर्सनच्या मते जिच्यामुळे माणसाला जगावेसे वाटते तिला संस्कृती असे म्हणतात. किंवा जीवनयात्रेची पद्धती ज्या सामाजिक, आचार, विचार, श्रद्धा आणि वाङ्मय यांमधून अभिव्यक्त होते. तिला संस्कृती म्हणायला हरकत नाही.

लोकसंस्कृतीच्या जडणघडणीमध्ये कृषिजीवनाचा आणि निसर्गाचा फार मोठा सहभाग आढळतो. आज जे सणसोहळे आणि देवदेवतांचे पूजाविधी आढळतात, ते सारे कृषी जीवनाशी निगडित आहेत. लोकजीवनातले कितीतरी सण हे कृषिसंस्कृतीचे सण आहेत. दिवाळी हा सण पूर्वी मुख्यतः कृषिजीवनाशी निगडित होता. वेळ अमावास्या, नव्याची पूनव, होळीचा सण, ग्रामदेवतांच्या जत्रा–यात्रा, भोगीचा सण, जलदेवतेची पूजा हे सारे शेतीशी संबंधित आहे. तसेच निसर्गाचे गूढ न समजल्याने त्यापासून आपणाला अपाय होऊ नये म्हणून पूजल्या जाणाऱ्या देवदेवतांची संख्या लोकसंस्कृतीत अधिक आढळते. साती–आसरा, मरिआई, म्हसोबा, वेताळ, काळूबाई या देवता आपले अनिष्ट होऊ नये म्हणून लोकमानसाने स्वीकारलेल्या आहेत. त्यामुळेच लोकसंस्कृती नाग, वड, पिंपळ, गाय, बैल, शेतीची अवजारे, जलचर, पिके यांची निष्ठेने पूजा करते. लोकसंस्कृती परंपरेला तुलनेने अधिक प्रमाण मानते. अभिजात संस्कार पांडित्य आणि शास्त्रीय दृष्टी यांचा कमी प्रभाव व परंपरेच्या प्रवाहातले जीवन हे लोकसंस्कृतीचे वैशिष्ट मानले जाते. या परंपराप्रियतेमुळे श्रद्धेपेक्षा अंधश्रद्धेला महत्त्व प्राप्त झालेले असते. भुताखेतांवर अन् करणीवर अधिक विश्वास ठेवणारे मन या संस्कृतीत आढळते.

निसर्ग हा लोकसंस्कृतीमधील एक महत्त्वाचा घटक असतो. निसर्गाचा सहवास, निसर्गाचे अनुकरण, निसर्गाची जगण्यासाठी मदत घेतल्याशिवाय या लोकमानसाला गत्यंतर नसते. निसर्ग हा लोकमानसाचा रक्षक असतो. तो शिक्षक

असतो आणि प्रसंगी तो संहारकही असतो. निसर्गाच्या लहरीशी स्वतःला जुळवूनच लोकसंस्कृतींमधील माणसाला जीवन जगावे लागते. त्यामुळे लोकसंस्कृतीतल्या व्यक्तीला निसर्गाचे सूक्ष्म निरीक्षण असते. कोणत्या ठिकाणी विहिर खणल्यावर पाणी लागेल. कोणत्या वनस्पतीचा पाला अथवा रस कोणत्या आजारासाठी वापरावयाचा, याचे भान नागर संस्कृतीतल्या माणसापेक्षा लोकसंस्कृतीमधल्या माणसाला अधिक असते. जंगलात सारे आयुष्य गेलेल्या आदिवासीला पावलांच्या ठशांवरून तो कोणाचा ठसा आहे. केव्हाचा आहे, त्याचे वय काय असावे इत्यादी गोष्टींचे अचूक ज्ञान असते. हे सारे निसर्गाच्या सहवासातून आणि निरीक्षणातून प्राप्त झालेले असते आणि त्यातूनच लोकसंस्कृतीची जडणघडण होत असते. तिला अधिक समृद्धी प्राप्त होत असते.

सामूहिकता हादेखील या संस्कृतीचा एक विशेष म्हणता येईल. नागर संस्कृतीतल्या समाजजीवनात सामूहिक जीवनाला स्थान नसते, अशातला भाग नाही. तेथेही सामूहिक जीवनाला वाव असतो. पण लोकसंस्कृतीमध्ये तो तुलनेने अधिक असतो. शेतीची विविध कामे करताना, निसर्गकोपाला सामोरे जाताना, पिकांची काढणी, मळणी करताना, एखादी विहीर खणताना, गावातल्या यात्रा साजऱ्या करताना, नेहमीचे सण-सोहळे आणि त्यांचे विधी करताना, धार्मिक गोष्टींची पूर्तता करताना एकापेक्षा अधिक माणसांची गरज असते. म्हणून सामूहिक जीवनाला येथे महत्त्वाचे स्थान आपोआप प्राप्त झालेले असते. परस्परांच्या सहाकार्याशिवाय येथे म्हणजे कृषिजीवनामध्ये पान हालत नसते. माणूस हा समूहप्रिय असल्याने अभिजनांच्या संस्कृतीमध्येही सामूहिक जीवनाला तसे स्थान असतेही. सण, सोहळे आणि विवाहादी धार्मिक विधीवेळी अशा सामूहिक जीवनाचे दर्शन घडते, पण लोकसंस्कृतीमध्ये जसे ते अपरिहार्य स्वरूपाचे असते, तसे ते अभिजनांच्या संस्कृतीमध्ये जाणवत नाही; एवढेच त्यातले मुख्य सूत्र !

**भारतीय संस्कृती –**

भारतीय संस्कृती ही देशाच्या इतिहासामुळे, विलक्षण भूगोलामुळे आणि जनतेतील वैविध्यामुळे आकारास आली आहे. शेजारच्या देशातील चालीरीती, परंपरा व कल्पना सामावून घेत, भारतीय संस्कृतीने सिंधुसंस्कृती दरम्यान जन्माला आलेले, तसेच वैदिक कालात दक्षिण भारतातील लोहयुगकाळात, बुद्ध धर्माच्या उद्‌भव आणि ऱ्हासाच्या काळात, तसेच भारताचे सुवर्णयुग, मुसलमानी आक्रमण व युरोपियन देशांच्या वसाहतींदरम्यान झालेले बदल पचवूनदेखील स्वतःचे परंपरागत प्राचीनत्व टिकवून ठेवले आहे.

The Culture of India has been shaped by its long history, unique geography, diverse demographics and the absorption of customs, traditions and ideas from some of its neighbours



as well as by preserving its ancient heritages, which were formed during the Indus valley civilization and evolved further during the vedic age the south Indian Iron Age, rise and decline and Buddhism, Golden age, muslim ocnquests and European colonization.

भारतात जागोजाग वेगवेगळे लोक, धर्म, वातावरण, भाषा, चालीरीती आणि परंपरा यात वैविध्य दिसत असूनही, आढळणारे साम्य हे या देशाचे वैशिष्ट्य आहे. देशभरात पसरलेल्या विविध उपसंस्कृती आणि हजारो वर्षांच्या परंपरा यांची एकत्रित वळलेली मोट म्हणजे भारतीय संस्कृती. ती अनेक प्रसिद्ध आध्यात्मिक गुरूंचे व योगशिक्षकांचे आश्रयस्थान आहे. देशातील विविधरंगी धार्मिक उत्सव, संगीत, नृत्ये, स्थापत्यशैली यातील कलात्मक बंध, तसेच भौगोलिक रचना आणि येथील पुरातन व आधुनिक संस्कृतीचा मिलाफ ह्या गोष्टी जगभरात त्या पर्यटकांना आकर्षित करतात.

**कुटुंब**

Family plays a big role in the Indian culture. India for ages has had a prevailing tradition of the joint family system. It's a system under which even extended members of a family like one's parents children, the children's spouses and their offspring etc. live together. The Indian family system who makes all important decisions and rules, whereas other family members abide by it.

Arranged marriages have the tradition in Indian society for centuries. Even today overwhelming majority of Indians have their marriages planned by their parents and other respected family. Members with the consent of the bride and groom. Arranged matches were made after taking into account factors such as age. Height personal values and tastes the backgrounds of their families (wealth, social standing) and their castes and the astrological compatibility of the couples horoscopes.

लोकसंस्कृतीमध्ये ज्या देवतांची उपासना केली जाते, पूजाअर्चा केली जाते, त्यातही आपणाला वेगवेगळेपणा जाणवतो. इंद्र, वरुण, उषा आणि पर्जन्य या देवतांची पूजा वेद काळातल्या प्रारंभिक अवस्थेत होत होती. ती लोकसंस्कृतीने स्वीकारलेली नाही. पौराणिक काळातल्या लोकप्रिय देवता म्हणजे विष्णू, शिव आणि रुद्र, यांपैकी लोकसंस्कृतीने शिवाची उपासना स्वीकारली; पण उरलेल्या दोन्ही देवतांची उपासना स्वीकारलेली नाही. त्यामुळे आजही ग्रामीण परिसरात

ब्रह्मा, विष्णू, महेश, रुद्र, वरुण इत्यादी देवतांची मंदिरे पाहवयास मिळत नाहीत. गणेश आणि सूर्य देवतेची मंदिरे ही अपवादात्मक ठिकाणी सापडतात किंवा मानव आणि देवयोनी याच्यामध्ये एक देवसदृश्य योनीची कल्पना करून यक्ष, गंधर्व, किन्नर, विद्याधर देव निर्माण केले गेले. त्यांचीही उपासना लोकसंस्कृतगीतात आढळत नाही. उलट गौण देवता मानलेल्या जगदंबेला स्वतंत्र देवतेचे स्थान दिले. पिशाच्च व सिद्ध यांचा मात्र स्वीकार केला. प्रामुख्याने गौण देवतांचा जो समूह आपल्या संस्कृतीने स्वीकारलेला आहे, त्यांची उपासना लोकसंस्कृतीत अधिक प्रमाणात रूढ असलेली दिसते, म्हणून खेड्यापाड्यांतून आपल्याला खंडोबा, ज्योतिबा, बहिरोबा, सिदोबा, म्हसोबा, रवळनाथ, यल्लमा, रेणुका, काळुबाई यांसारख्या आणखी कितीतरी देवदेवतांची मंदिरे पाहवयास मिळतात. या त्यांच्या ग्रामदेवता झालेल्या आहेत. लोकसंस्कृतीने ज्या देवतांची पूजाअर्चा स्वीकारली. त्यातूनच तिला वेगळेपण प्राप्त झालेले आढळते. ही पूजाअर्चाही उन्नत जीवनाच्या ओढीपोटी निर्माण झालेली नाही. अरिष्टांपासून संरक्षण, कोपापासून कृपा, सुख आणि समृद्धी यापोटी निर्माण झालेली आहे. त्यामुळे लोकसंस्कृतीला विविध स्तर, विविध रंग, विविध रूपे प्राप्त झाल्यासारखी जाणवतात. गोत्रे या पाश्चात्य पंडिताने असे म्हटले आहे की, लोकसंस्कृती हा इतिहास नव्हे, इतिहासाचा तो स्वतंत्र विषय आहे. त्याचे स्वतःचे असे काही नियम आणि सिद्धांत आहेत. तसेच लोकसंस्कृतीचा केवळ समाजशास्त्राच्या दृष्टीने विचार करणे म्हणजे एकांगी भूमिका ठरेल. लोकसंस्कृती हे काही निर्जीव शास्त्र नाही. बाह्यरूपाने त्याचा अभ्यास जितका आवश्यक आहे. तितकाच आंतरिक रूपानेही आवश्यक आहे, म्हणून लोकसंस्कृती हे एक महत्त्वपूर्ण असे जिवंत शास्त्र आहे. लोकजीवनाइतकाच लोकसंस्कृतीचा विस्तार आहे. यात आत्मापरमात्मा येथपासून तो जादूटोणा येथपर्यंत सारे विषय येतात. त्यात उद्योग येतो, व्यवसाय येतो. भविष्य येते, नवस येतो, आणि भाविकांनी रचलेल्या देवदेवतांच्या कथा व कहाण्याही येतात. एवढा तिचा विस्तार आहे.

लोकसंस्कृतीबरोबर ग्रामदेवताही महत्त्वाच्या आहेत. लोकसंस्कृतीला जे वेगळेपण प्राप्त झालेले आहे. त्यात या दैवतांचा फार मोठा वाटा आहे. शिवाय ही दैवते आणि त्यांचे करावयाचे विधी हे व्यक्ती, कुटुंब समाज आणि मनोविश्व यांच्या केंद्रस्थानी वसलेले आहेत. लोकमानसाच्या भावविश्वात या दैवतांना अपार श्रद्धेचे स्थान प्राप्त झालेले आहे. त्यामुळे गाव सोडून शहरात राहणारा चाकरमान्या आपल्या ग्रामदेवतेच्या यात्रेला बायकोमुलांसह न चुकता येऊन दर्शन घेऊन जात असलेला आपण पाहतो. बोललेला नवसही तो तितक्याच श्रद्धेने फेडत असतो. अशा या ग्रामदेवतांची निर्मिती कशी झाली हाही मुद्दा महत्त्वाचा आहे.



ग्रामदेवता आणि कुलदेवता या ग्रामाच्या निकुळाच्या संरक्षक देवता मानलेल्या आहेत. ग्रामीण परिसरात या देवतांना आजही फार मोठे स्थान आहे. खेड्यातला मोठा समाज यांची निष्ठापूर्वक उपासना करतो. ज्योतिबा, खंडोबा, तुळजाभवानी, योगेश्वरी, मंगेश, व्याघ्रेश्वर या कुळाच्या विशिष्ट देवता मानलेल्या आहेत. वास्तविक पाहता यापूर्वी ग्रामदेवता या परिवार देवता या वर्गात मोडणाऱ्या देवता होत्या. त्यांचे उन्नयन झाले. त्यांना अधिक वेगळेपण प्राप्त झाले नि कुलदेवता म्हणून कुलाच्या देव्हाऱ्यावर त्या जाऊन बसल्या. या ग्रामदेवता उग्र व भयंकर असतात. त्यांना बळी द्यावा लागतो अशी समजूत रूढ आहे.

परिवार–देवता, ग्रामदेवता, अतिमानवी देवता आणि क्षुद्र देवता या साऱ्या देवतांना ग्रामदैवते मानलेले आहे. शिवाय वैदिक संस्कृतीच्या साहचर्यामुळे आलेल्या देवताही त्यात समाविष्ट झालेल्या आहेत. एतद्देशीय लोकांच्या संस्कृती मधून आलेल्या आणि अनेक आदिवासी जाती–जमातींमध्ये रूढ असलेल्या देवतादेखील या ग्रामदैवतांमध्ये सामावलेल्या आहेत. त्यामुळे लोकसंस्कृतीमधील ग्रामदैवतांचे स्वरूप संमिश्र, प्रगत नि अप्रगत व उन्नत नि अवनत, नवसनिष्ठ नि अनासक्त, सकाम नि निष्काम अशा प्रकारचे झालेले आहे. त्यातल्या काहींना कुलदैवताचे स्वरूप प्राप्त झाले आहे. काही ग्रामदैवता नि परिवार देवता या स्वरूपात आजही लोकमानसावर आपले अधिराज्य गाजवीत आहेत.

## संदर्भग्रंथ


१) लोकसंस्कृती : स्वरूप आणि विशेष :– डॉ. द. ता. भोसले
२) लोकसाहित्य : कला आणि संस्कृती :–
प्रा. डॉ. द.के. गंधारे
प्रा.डॉ. तुकाराम रोंगटे
प्रा.डॉ. निवृत्ती मिसाळ
३) लोकसाहित्य संशोधन :– डॉ. भास्कर शेळके
४) लोकसाहित्य बदलते संदर्भ – बदलती रूपे :– डॉ. गंगाधर मोरजे
५) भारतीय संस्कृती – विकिपीडिया, मुक्त ज्ञानकोश.


❀❀